**प्रकल्प प्रवर्तक मे. जेएसडब्ल्यू एनर्जी पीएसपी सेव्हन लिमिटेड, जेएसडब्ल्यू सेंटर, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ महाराष्ट्र  यांच्या प्रस्तावित पाने ओपन लूप पंप्ड स्टोरेज प्रकल्प (१५०० मेगावॅट), प्रकल्प गावः- पाने आणि वाघेरी, तालुका-महाड, जिल्हा-रायगड, महाराष्ट्र येथे उभारणी करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचे इतिवृत -**

---

प्रकल्प प्रवर्तक मे. जेएसडब्ल्यू एनर्जी पीएसपी सेव्हन लिमिटेड, जेएसडब्ल्यू सेंटर, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ महाराष्ट्र  यांच्या प्रस्तावित पाने ओपन लूप पंप्ड स्टोरेज प्रकल्प (१५०० मेगावॅट), प्रकल्प गावः- पाने आणि वाघेरी, तालुका-महाड, जिल्हा-रायगड, महाराष्ट्र  येथे उभारणी करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी मंगळवार, दिनांक ०५ नोव्हेंबर, २०२४ रोजी दुपारी  ०३.०० वाजता हॉटेल फाऊन्टन इन (लॉन), मुक्काम पोस्ट-नडगाव तर्फे बिरवाडी, सावित्री पुलाजवळ, मुंबई-गोवा हायवे, तालुका-महाड, जिल्हा-रायगड (४०२ ३०९), महाराष्ट्र येथे  आयोजित करण्यात आलेली होती.

श्री ईश्वर ठाकरे, उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, महाड तथा आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री संदेश शिर्के, अपर जिल्हादंडाधिकारी, रायगड, अलिबाग तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री संजय भोसले, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे अधिकारी, पत्रकार, पर्यावरणविषयक कार्यरत सेवाभावी संस्था, चॅनलचे प्रतिनिधी व मोठ्या संख्येने उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे स्वागत करुन माननीय अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरणविषयक जनसुनावणी प्रक्रिया सुरु केली.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ

पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

आयोजक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्‌देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे असा आहे.

आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मे. जेएसडब्ल्यू एनर्जी पीएसपी सेव्हन लिमिटेड, जेएसडब्ल्यू सेंटर, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ महाराष्ट्र, महाराष्ट्र यांचा त्यांच्या प्रस्तावित पाने ओपन लूप पंप्ड स्टोरेज प्रकल्प (१५०० मेगावॅट), प्रकल्प गावः- पाने आणि वाघेरी, तालुका-महाड, जिल्हा-रायगड, महाराष्ट्र येथे उभारणी करणे संदर्भात पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणीआयोजित करण्यासाठीचा प्रकल्प प्रवर्तकांचा दिनांक रोजीचा अर्ज मुख्यालय,

महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास २९-०७-२०२४ रोजी आणि प्रादेशिक अधिकारी - रायगड, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, रायगड भवन, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई येथे ३१-०७-२०२४ रोजी प्राप्त झाला.

सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित अधिसुचनेनुसार संवर्ग ए १ (सी) – (River Valley/Irrigation Project) यात मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांची प्राथमिक मान्यता (ToR) प्राप्त करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक २७-११-२०२३ रोजी सादर केला. ४१ व्या ईएसी (Environment Appraisal Committee) बैठकीसमोर

तांत्रिक सादरीकरण करण्यात आले आणि भारत सरकारने ऑनलाईन मंजूरी दिनांक ३०-०१-२०२४ रोजी प्रदान केली.

त्यानुसार, प्रकल्प प्रवर्तकांनी नाबेट प्रमाणपत्र प्राप्त असलेली पर्यावरण सल्लागार यांची नियुक्ती केली आणि नियुक्त केलेल्या पर्यावरण सल्लागाराद्वारा प्रकल्प स्थानापासून १०.० किमी त्रिज्येमध्ये तपशीलवार पर्यावरण सर्वेक्षण केले. प्रस्तावित प्रकल्प उभारणीमुळे पर्यावरणावर होणा-या संभाव्य परिणामाचा अभ्यास केल्यानंतरच प्रकल्प स्थान आणि १०.० कि.मी. परिघाचा प्रारुप पर्यावरण आघात मूल्यांकन (Draft EIA) अहवालाचा मसुदा तयार करण्यात येऊन तो सादर करण्यात आला.

मात्र प्रकल्प प्रवर्तक यांनी टीओआर दुरुस्तीसाठी दिनांक २८-०९-२०२४ रोजी अर्ज सादर केलेला असून त्यासाठी ईएसी ची बैठक ही ०५-११-२०२४ रोजी होणार आहे.

सहसंचालक (जल प्रदूषण नियंत्रण), महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी पत्र दिनांक ३१-०७-२०२४ नुसार उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, महाड यांना

पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्याची प्रक्रिया राबविण्याची सूचना केली.

उप प्रादेशिक कार्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, महाड यांनी पत्र दिनांक १०-०९-२०२४ रोजी मा. जिल्हाधिकारी,रायगड,अलिबाग यांना सदरहू प्रकल्पाबाबत पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्याची विनंती केलेली होती.

मा. जिल्हाधिकारी,रायगड,अलिबाग यांनी त्यांच्या पत्र दिनांक २७-०९-२०२४ नुसार प्रत्यक्ष (Physical) पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्यास प्रकल्प स्थानावर मंगळवार, दिनांक ०५ नोव्हेंबर, २०२४ रोजी दुपारी ०३. ०० वाजता मान्यता दिल्यानंतर मा. सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना एस.ओ. क्रं. १५३३, दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना एस. ओ. ३०६७ (इ), दिनांक ०१-१२-२००९ अनुसार कार्यालयीन आदेश क्रं. ई- १६४/ २०२४, व्दारा पत्र क्रं. बीओ / जेडी (डब्लुपीसी)/पीएच/बी--

२४१०१०- एफटीएस-००८०, दिनांक - १०-१०-२०२४ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केली:-

१) जिल्हादंडाधिकारी, रायगड, अलिबाग, किंवा त्यांचे प्रतिनिधी (अपर जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) - **अध्यक्ष**

**२)** महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,मुंबई यांचे प्रतिनिधी –
प्रादेशिक अधिकारी - रायगड,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
रायगड भवन, ६ वा मजला, सेक्टर-११,
सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४ - **सदस्य**

३) उप प्रादेशिक अधिकारी,
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,
महाड - **आयोजक**

तसेच सदरहू अधिसूचनेनुसार उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, महाड यांनी जनसुनावणी दिवसाच्या ३० दिवस अगोदर स्थानिक वृतपत्र दैनिक सागर यात

मराठीत दिनांक ०२-१०-२०२४ व राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत दिनांक ०४-१०-२०२४ रोजी जनसुनावणी सूचना सर्व जनतेस अवगत करण्यासाठी प्रकाशित केलेली होती. त्याचप्रमाणे सदरहू प्रकल्पाबाबतचा सर्व दस्तावेज लोकांच्या माहितीकरीता खालील अधिसूचित कार्यालयात उपलब्ध करण्यात आलेले होते -

१) क्षेत्रीय कार्यालय, पश्चिम मध्य झोन, पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, न्यु सेक्रेटरिअल बिल्डिंग तळमजला, ईस्ट विंग, सिव्हिल लाईन, नागपूर-४४० ००१,
२) मा. जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, रायगड,अलिबाग,
३) महाव्यवस्थापक, जिल्हा उद्योग केंद्र, रायगड,अलिबाग,
४) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद कार्यालय, रायगड,अलिबाग,
५) तहसीलदार, तहसील कार्यालय,महाड,जिल्हा-रायगड
६) गट विकास अधिकारी, पंचायत समिती,तालुका-महाड, जिल्हा-रायगड,
७) मुख्याधिकारी, महाड नगरपरिषद, तालुका-महाड, जिल्हा-रायगड.
८) **<u>ग्रामपंचायत कार्यालयेः-</u>** ग्रुप ग्रामपंचायत-पाने, ग्रामपंचायत-वारंगी, ग्रामपंचायत-दापोली,ग्रुप ग्रामपंचायत-निजामपूर-

वाघेरी-रायगडवाडी-छत्री निजामपूर, ग्रामपंचायत-बावले, ग्रामपंचायत-सांदोशी, ग्रामपंचायत-पाचाड,ग्रामपंचायत-वालसुरे, ग्रामपंचायत-कोंझर, ग्रामपंचायत-वाघोली, ग्रुप ग्रामपंचायत-पंदेरी-पंदेरी-मांघरुन-देवघर,ग्रामपंचायत-सावरट, ग्रामपंचायत-गरजेवाडी, ग्रुप ग्रामपंचायत-वाकी बु., शेवते, ग्रामपंचायत-पांगारी,ग्रामपंचायत-वरंडोली, ग्रुप ग्रामपंचायत-मांडले-पारवाडी, ग्रामपंचायत-तळोशी, ग्रामपंचायत-चापगाव, ग्रामपंचायत-पुनाडे, ग्रामपंचायत-खर्डी, ग्रामपंचायत-कोथुर्डे, ग्रामपंचायत-नेराव, ग्रामपंचायत-करमार, ग्रुप ग्रामपंचायत-वाळण खुर्द-आड्राई, ग्रामपंचायत-दाभेकर कोंड, ग्रामपंचायत-कुंभे माच, ग्रामपंचायत-कावळे, ग्रुप ग्रामपंचायत-वाळण-बुद्रुक झोलीचा कोंड, केतकीचा कोंड, ग्रामपंचायत-धामणे.

९) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन प्रशासकीय इमारत, १५ वा मजला, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,

१०) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरू पॉईंट, ३रा मजला, सायन माटुंगा स्कीम रोड नं. ८, सायन (पूर्व), सायन सर्कल जवळ, मुंबई - ४०० ०२२,

११) प्रादेशिक अधिकारी-रायगड, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ रायगड भवन, ६ वा मजला, सेक्टर-११, सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४

१२) सहसंचालक, औद्योगिक सुरक्षा व आरोग्य-रायगड, ६वा मजला, कोंकण भवन विस्तार, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४

१३) सह मुख्य विस्फोटक निरिक्षक, अ-१ व अ-२ विंग, ५ वा मजला, सीजीओ कॉम्प्लेक्स, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई
१४) उप प्रादेशिक अधिकारी-महाड, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, सी.एफ.सी. बिल्डिंग, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ परिसर, महाड, तालुका-महाड, जिल्हा-रायगड - ४०२ ३०९
१५) संकेतस्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,- मराठी व इंग्रजीमध्ये कार्यकारी सारांश उपलब्ध

आजतागायत उपरोक्त प्रकल्पाविषयी उप प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, महाड यांना ४/२ सूचना/आक्षेप प्राप्त झालेले आहेत.

आयोजक यांनी उपस्थित असलेल्या सर्वांना त्यांचे काही आक्षेप,हरकती, सूचना असल्यास ती संधि देण्यात आलेली असून ते लेखी वा तोंडी स्वरुपात ती देऊ शकतात असे सांगितले.

आयोजक यांनी प्रतिपादन केले की ही समिती फक्त लोकांचे पर्यावरणविषयक मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून प्रकल्प संमत करणे, नाकारणे किंवा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. स्थानिकांनी जनसुनावणीत उपस्थित केलेल्या

सूचना/आक्षेप यांची इतिवृतात नोंद घेण्यात येईल व त्याचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीचे व्हिडिओ रेकॉर्डींग, जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकांचा सुधारित पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल, प्राप्त झालेल्या लेखी सूचना/आक्षेप, बैठकीचे इतिवृत्त मराठी व इंग्रजीत पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांना मा. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहीर जनसुनावणी समिती यांच्या संमतीने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ यांच्यातर्फे सादर करण्यात येत असते. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. आयोजक यांनी अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

प्रकल्प प्रवर्तक यांनी माननीय अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाविषयी व प्रकल्पातील पर्यावरण व्यवस्थापन योजनेविषयी सादरीकरण केले.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की प्रकल्प प्रवर्तक मे. जेएसडब्ल्यू एनर्जी पीएसपी सेव्हन लिमिटेड, जेएसडब्ल्यू सेंटर, बांद्रा-कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई - ४०० ०५१ महाराष्ट्र यांनी लोकांची मागणी लक्षात घेऊन प्रदूषणमुक्त वीज पुरविण्यासाठी १५०० मेगावॅट क्षमतेचा प्रस्तावित पाने ओपन लूप पंप्ड स्टोरेज प्रकल्प, प्रकल्प गावे:- पाने आणि वाघेरी, तालुका-महाड, जिल्हा-रायगड, महाराष्ट्र येथे उभारणी करण्याचे नियोजित केलेले आहे. या प्रकल्पासाठी पाने येथे तालुका-महाड, जिल्हा-येथे जलाशय निम्न जलाशय (Lower Storage) विकसित करण्यात येणार असून त्याची जास्तीतजास्त उंची ७२.० मीटर (from deepest bed level) असून धरणाच्या वरिल भागाची रुंदी ही ४३६.९२ मीटर एवढी आहे. प्रकल्पातील ऊर्ध्व जलाशय (Higher Storage) हे पुणे जिल्ह्याततील खानू गावात आहे.

सदरहू प्रकल्पाचा एकूण खर्च हा रुपये ७,४१९.६० कोटी असून प्रकल्पात पर्यावरण व्यवस्थापन योजनेसाठी भांडवली खर्च - रुपये ६७.७५ कोटी तर आवर्ती खर्च - १.७३ कोटी/वार्षिक एवढा राहिल.

प्रकल्प बांधकाम टप्प्यात कायमस्वरुपी कर्मचारी हे १२५, तर कंत्राटी कर्मचारी २,१०० एवढे लागतील. प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर कायमस्वरुपी कर्मचारी हे १००, तर कंत्राटी कर्मचारी हे ७० एवढे लागतील. लागणारे मनुष्यबळ हे स्थानिक परिसरातूनच घेण्यात येईल.

प्रकल्प प्रवर्तक यांनी पर्यावरण व्यवस्थापन योजना (EMP) बाबत माहिती देताना सांगितले की बांधकाम टप्प्यासाठी कामगार वसाहतीसाठी ३५.० केएलडी क्षमतेचा पोर्टेबल एसटीपी स्थापित करण्यात येईल. तसेच प्रकल्पात आवाज नियंत्रणात राहण्यासाठी डी.जी. सेटमध्ये ध्वनीक आवरण (Acoustic Enclosure) बसविण्यात येईल. प्रकल्पात निर्माण होणारा चिखल (muck) -५०% पुनर्वापर, तर उर्वरित ५०% डंपिंग साईटवर विल्हेवाट लावण्यात येईल. प्रकल्पात हरितपट्टा विकसित करताना वृक्षारोपणाची घनता १,००० झाडे प्रति हेक्टर एवढी राखली जाईल तर वनविभागाच्या निर्देशांनुसार देशी प्रजातींची लागवड करण्यात येईल. सदरहू प्रकल्पामुळे परिसरातील स्थानिकांच्या आर्थिक आणि सामाजिक विकासामध्ये निश्चतच वाढ होईल.

सादरीकरण पूर्ण झाल्यानंतर आयोजक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्तावित प्रकल्पाबाबत आपल्या सूचना, आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले. प्रश्न विचारताना आपले नांव व पत्ता सांगण्याची सूचना केली.

**उपस्थित नागरिकांनी विचारलेले प्रश्न व त्यास प्रकल्प प्रवर्तक / प्रकल्प सल्लागार / पर्यावरणविषयक जाहिर लोकसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे याबाबतची माहिती पुढीलप्रमाणे आहे-**

१) **श्री गणेश श्रीधर मोरे, राहणार-वाघेरी, तालुका-महाड, जिल्हा-रायगडः-**

| **अनु. क्रं.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | सदरहू प्रकल्पाची जेथे स्थापन होणार आहे, त्याच्या खालच्या बाजूस आमची विहिर आहे. प्रस्तावित प्रकल्प हा आमच्या विहिरीच्या पाण्यात येत आहे. आमचा प्रकल्पास विरोध नाही. पण प्रकल्पासाठी बांधकाम चालू | प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की प्रकल्प बांधकामामुळे पाणी खराब होणार नाही. प्रकल्प बांधकाम टप्प्यात व कार्यान्वित झाल्यानंतर पाणी खराब होऊ नये याची काळजी घेण्यात येईल. तसेच पाण्याची गुणवत्ता, शुध्दता |

| | | |
|---|---|---|
| | करताना आमच्या विहिरीचे पाणी खराब होऊ नये, याबाबत काय उपाययोजना योजण्यात येतील? | ही पर्यावरण मानकांप्रमाणेच राखण्यात येईल. |
| २) | प्रकल्प बांधकाम टप्प्यात प्रकल्पासाठी ब्लास्टींग करावे लागेल. त्यामुळे वाघेरी गावातील पाण्याचे स्त्रोत बाधित होतील का, बंद होतील का किंवा पाण्याचा प्रवाह बदलेल का? कारण आमची एकच विहिर असून आम्हांला दुसरी काहीच पाण्यासाठी व्यवस्था नाही. | पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की प्रकल्पात ब्लास्टींगचे काम मोठ्या प्रमाणात नाही. तसेच ब्लास्टींगचे पॅटर्न, डिझाईन केलेले असतात. ब्लास्टींग करताना त्यात डिले डेटोनेटर्स असतात. त्यामुळे भूगर्भातील पाण्याचे स्त्रोताचे प्रवाह बदलणार नाहीत. |
| ३) | श्री मोरे यांनी वाघेरी गावातील पाण्याचे स्त्रोत बाधित होणार नाहित याबाबत हमी मागितली. | प्रकल्प प्रवर्तक यांनी ती देण्याची कबूली दिली. |
| ४) | तसे असेल तर या प्रकल्पाचे वाघेरी गावातर्फे स्वागत करत आहोत. | प्रकल्प प्रवर्तक यांनी आभार मानले. |

२) **<u>श्री दत्ताराम कोडिंबा ढेरे, राहणार-वारंगी गाव, तालुका-महाड, जिल्हा-रायगडः-</u>**

| **अनु. क्रं.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | सदरहू प्रकल्प हा वारंगी गावाच्या घाटाच्या अगदी कुशीत आहे. प्रकल्प बांधकाम टप्प्यात जी धूळ, घाण तयार होणार आहे, ती सर्व वारंगी गावात येणार आहे, कारण वारंगी गाव हे घाटावर आहे. तसेच सदरहू प्रकल्प हा अगदी घाटावरच होणार असल्याने अगदी शिवकालापासून आतापर्यंत तोच रस्ता शिवभक्त रायगडावर जाण्यासाठी वापरत आहेत. प्रकल्पामुळे तेथील शिवभक्ताचा रस्ताच बंद होणार आहे. त्याबाबत पर्यायी योजना | प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की प्रस्तावित प्रकल्पास पर्यावरण अनुमती (Environment Clearance-EC) प्राप्त झाल्यानंतर प्रकल्प बांधकामास सुरवात करण्यात येईल. त्यावेळी पर्यावरण अनुमतीतील सर्व निर्देश आणि मानके (norms) पाळण्यात येतील. परिसरात धुळीचा, कच-याचा कुठलाच त्रास प्रकल्प परिसरातील जनतेस न होण्याची प्रकल्प प्रवर्तक पूर्ण काळजी घेतील. प्रकल्पाचा आराखडा (design) मंजूर करताना शासन या सर्व बाबी तपासूनच संमती प्रदान करत असते. त्या |

| | | |
|---|---|---|
| | आहे का? सदरहू प्रकल्पामुळे खालच्या गावातील पाणी बंद होणार आहे. डोंगराखाली हेदमाचीवाडी गाव आहे. प्रकल्पामुळे त्यांचे पाणी बंद होणार आहे. तर त्या गावाला पाणी पुरविण्याची योजना आखली आहे काय? तेथील लोकांना त्याठिकाणीच निवास करण्यासाठी काय योजना आहे?तसेच प्रकल्प हा घाटाच्या कुशीत आहे. वारंगी हे गाव घाटावर वसलेले आहे. जर काही अपघात झाल्यास सर्व पाणी वारंगी गावात येऊन खालची सर्व गावे ही नष्ट होतील. त्याबाबत काही कृती आराखडा (Action Plan) तयार आहे काय? याबाबत सर्व माहिती सांगण्यात यावी. | सर्व बाबींची पूर्तता करण्यात येईल. |
| २) | या प्रकल्पापासून गावाला काही तोटा होणार असल्यास त्याची माहिती देण्यात यावी. | प्रकल्प प्रवर्तक यांनी माहिती दिली की ज्या गावात हा प्रकल्प स्थापित आणि कार्यान्वित होणार |

| | | |
|---|---|---|
| | | आहे, त्या गावाला कोणताही तोटा या प्रकल्पामुळे होणार नाही. त्यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रस्तावित प्रकल्पात डोंगरावर एक जलाशय व खाली एक जलाशय व वीजनिर्मिती याबाबत बैठकीत माहिती सांगितली |
| ३) | काही घरे आहेत, ती आमच्या ग्रामपंचायतीत आहेत आणि पानेगाव आमच्या शेजारी आहे. जर प्रकल्प पूर्ण झाला, तर त्या गावांना वीजपुरवठा, पाणी पुरवठा कसा देणार? कायमस्वरुपी मोफत देणार काय, याबाबत स्पष्टीकरण देण्यात यावे | प्रकल्प प्रवर्तक यांनी स्पष्टीकरण दिले की आम्ही फक्त गावातील पाणी वापरणार असून निर्माण होणारी वीज ही शासनास देण्यात येईल. तसेच प्रकल्प बांधकामासाठी लागणारे पाणीसुध्दा आम्ही शासनाकडूनच घेणार आहोत. |
| ४) | शेतीला किती टक्के पाणी सोडणार. हे लेखी स्वरुपात माहिती देण्यात यावी. पुणे-रायगड शिवप्रेमीचा रस्ता - जोडणी करण्यात यावी. | त्यावेळी अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रस्तावित प्रकल्पाचे डिझाईन समजून घेण्याची सूचना केली. प्रस्तावित प्रकल्पात डोंगरावर |

| | | |
|---|---|---|
| | | एक जलाशय व खाली एक जलाशय असणार असून बाकी सर्व प्रकल्प हा भूगर्भात राहणार आहे. त्यामुळे रस्ता बंद होणारच नाही. तसेच गावाला जो पाणीपुरवठा त्यात काहीही प्रकल्पामुळे अडथळा येणार नाही. |

३) **<u>श्री भगवंत दगडू जाधव, उपसरपंच, पाने ग्रामपंचायत, तालुका-महाड, जिल्हा-रायगडः-</u>**

हा नियोजित प्रकल्प आमच्या पाने गावात होणार आहे. त्यात आतापर्यंत कुठेही वाघेरी गावाचा समावेश दिसला नाही. आमच्यादृष्टीने वाघेरी गावाचा या प्रकल्पात संबंध नाही. तरी पाने-वाघेरी असे सादरीकरणात दर्शविलेले आहे. प्रथम त्याचा खुलासा करण्यात यावा.

प्रकल्प प्रवर्तक यांनी स्पष्टीकरण दिले की प्रकल्पाचा अगदी थोडा भाग जरी पाने गावाच्या क्षेत्रात येत असेल, तरीही पाने-वाघेरी असे म्हटले जाते.

श्री जाधव यांनी वाघेरी गावाचा भाग/क्षेत्र नकाशात दाखविण्याची मागणी केली.

## ४) श्री प्रकाश सीताराम शेडगे, राहणार-पाने गाव, तालुका-महाड, जिल्हा-रायगडः-

जनसुनावणी बैठकीच्या अगोदर संबंधित प्रकल्प अधिका-यांसोबत चर्चेसाठी दोनवेळा बैठका झालेल्या आहेत. त्यावेळी त्यांनी संपूर्ण नकाशासहित प्रकल्पाची माहिती देताना सांगितले की प्रस्तावित प्रकल्प हा फक्त पाने गावाच्या हद्दीतच नियोजित आहे. दुस-या गावाचा त्यात समावेश नाही असे ठामपणे सांगितले होते. आता मात्र सादरीकरणात पाने गावात वाघेरी गावाचे नांव जोडण्यात आलेले आहे. तरी वाघेरी गावाचे प्रकल्पातील क्षेत्र किती आहे ते सांगण्यात यावे. जर फक्त रस्त्यापुरतेच (वाघेरी गावाचा) येत असेल, तर रस्ता अनेक गावांमधून येत असतो. तरी प्रकल्प अधिका-यांनी याबाबत खुलासा करावा.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प प्रवर्तक यांना प्रस्तावित प्रकल्पात कुठले गट नंबर पाने गावाचे, कुठले गट नंबर वाघेरी गावाचे येतात, याची संपूर्ण माहिती देण्याची सूचना केली.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की उपस्थित केलेल्या सर्व मुद्द्यांची माहिती उपलब्ध करुन देण्यात येईल.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प प्रवर्तकांना विचारणा केली की जर संबंधित व्यक्तीस अगोदर

नकाशासहित प्रकल्पाची माहिती सांगितलेली होती, तर आता प्रस्तावित प्रकल्पाचा नकाशा बदलण्यात आलेला आहे का?

प्रकल्प प्रवर्तक यांनी नकाशा बदलण्यात आलेले नाही असे सांगितले.

अध्यक्ष यांनी या बैठकीनंतर संबंधित व्यक्तीस कुठले गट नंबर बाधित होतील, पाने गावातील गट नं., वाघेरी गावातील गट नंबर व नकाशा याची प्रत उपलब्ध करुन देण्याची सूचना केली. प्रस्तावित प्रकल्पाचा नकाशा हा सार्वजनिक दस्तावेज (Public Document) आहे, त्यामुळे बैठकीनंतर त्या व्यक्ती थांबतील, संबंधितांना पूर्ण दस्तावेज उपलब्ध करुन देण्यात यावा.

त्यावेळी **श्री भगवंत दगडू जाधव, उपसरपंच. पाने ग्रामपंचायत** प्रस्तावित प्रकल्प स्थानापासून वाघेरी गाव किती अंतरावर आहे? प्रकल्पात पाने गावाचे क्षेत्र निश्चितच जात आहे. पाने गावाची हद्द् कुठे आहे हे प्रकल्प प्रवर्तक यांना ज्ञात आहे. मात्र आता वाघेरी गावाचे नाव ऐकत आहे. तर प्रकल्पात वाघेरी गावाचे किती क्षेत्र जाते याची माहिती येथे बैठकीत सांगण्यात यावी अशी आमची सूचना आहे.

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की प्रकल्पाचा थोडासा भाग हा वाघेरी गावात होता. त्यात Project Facility Area होता. बाकीची सर्व माहिती देण्यात येईल.

**अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी** Project Facility Area म्हणजे कामगार वसाहत आहे का?

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की तेथे गॅरेज, साधनसामुग्री ठेवण्याची जागा निश्चित केली. त्यांनी सांगितले प्रकल्पाचे क्षेत्र पाने गावात १८७.० हेक्टर आहे, खानू गावात ७५.० हेक्टर क्षेत्र, तर वाघिरे गावामध्ये ३१.० हेक्टर क्षेत्र येत आहे.

येथे **अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी** गट नंबर सांगण्याची सूचना केली. त्यावेळी प्रकल्प प्रवर्तक यांनी ती माहिती संबंधितांना उपलब्ध करुन देण्याचे आश्वासन दिले.

येथे **श्री प्रकाश सीताराम शेडगे, राहणार-पाने गाव, तालुका-महाड, जिल्हा-रायगड** यांनी आक्षेप नोंदविला की योजना व नकाशा हे २-३ वर्षांपूर्वीचे आहेत. जर असे योजना (Plan), आरेखन नव्याने बदलत राहिले तर जनतेने कुठला प्लॅन ग्राह्य धरावा. पाने गावाचे एकूण क्षेत्र हे ३,०००.० स्क्वेयर मीटर आहे. तर पाने गावातच अतिरिक्त ३१.० हेक्टर क्षेत्र घेणे शक्य होते. तर त्यासाठी वाघेरी गावाचा भूखंड घेण्याची गरज का वाटली?

**अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी प्रकल्प प्रवर्तकांना विचारणा केली की उपस्थित श्री शेडगे यांचे असे म्हणणे आहे की पाने गावात तेवढे क्षेत्र उपलब्ध असताना वाघेरी गावाच्या क्षेत्रात जाण्याची काय गरज पडली?

त्यावेळी प्रकल्प प्रवर्तक यांनी स्पष्टीकरण दिले की प्रकल्पाच्या डिझाईनची ज्याप्रमाणे गरज होती, त्याप्रमाणे तेथे जास्त वनक्षेत्र असल्याने प्रकल्पाचा काही भाग हा वाघेरी क्षेत्रात वर्ग करण्यात आला.

त्यावेळी **<u>उपसरपंच, पाने ग्रामपंचायत,  श्री भगवंत दगडू जाधव</u>** यांनी मत मांडले की वनविभागाची जमिन या प्रकल्पापासून दूर आहे. वनक्षेत्रात जायची गरज लागणार नाही, एवढा मोठा आमचा परिसर आहे.  आतापर्यंत कधिही वाघेरी नांव सांगितलेले नव्हते. आज पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणीत वाघेरी गावाचे नाव सागितले, तर एवढ्या वेळा आपल्या बैठका झाल्या, त्यावेळी का सांगण्यात आले नाही. प्रकल्पासाठी सर्व जमिनी आमच्या पाने ग्रामस्थांच्या जात आहेत. तर वाघेरी गावाचा संबंधच येत नाही. तरी वाघेरी गावाचे गट नंबर सांगण्यात यावेत.

त्यावेळी **अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी श्री जाधव यांना पाने गावातीलच ३१.० हेक्टर जमिन घ्यावी अशी आपले म्हणणे आहे काय याबाबत विचारणा केली. श्री जाधव यांनी मत मांडले की पाने गावात जमिन उपलब्ध असतानाही वाघेरी गावात जाण्याची गरज काय पडली याची माहिती मिळावी.

**<u>श्री प्रकाश सीताराम शेडगे, राहणार-पाने गाव, तालुका-महाड, जिल्हा-रायगड</u>** यांनी मत मांडले की प्रकल्प प्रवर्तक जे कारण सांगतात, ते न पटण्यासारखे आहे.  त्यामुळे जनतेत संभ्रम निर्माण

होत आहे. वनक्षेत्र पाण्याखाली जात आहे, ते मान्य करण्यात येते. पण पाने गावात जमिनी या मालकी हक्काच्या आहेत, आणि तेथे वनक्षेत्र हे येतच नाही. फक्त ३१.० हेक्टरचाच प्रश्न होता. गेले दोन वर्षे आमच्या वाटाघाटी, चर्चा चालू आहेत. जर असा बदल होत राहिला, तर प्रकल्प प्रवर्तकांवर कुठल्या शब्दावर कितपत विश्वास ठेवायचा हा प्रश्न उपस्थित होतो.

**अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी बैठकीत सांगितले की प्रस्तावित प्रकल्पाचा जो प्लॅन शासनाने मंजूर केला, त्याच्यावर ही जनसुनावणी आयोजित करण्यात आलेली आहे.

**५) <u>श्री काशीराम गौरु कडू, राहणार- कडसरी लिंगाणा, तालुका-महाड, जिल्हा-रायगडः-</u>**

गेले वर्षभर आमच्या पाने गावात प्रकल्पाचे काम चालू आहे. आमच्या वडिलोपार्जित जमिनी या कडसरी लिंगाणा गावात आहेत. आम्ही अनुसूचित जाती जमातीचे लोक आहोत. तरीदेखील या प्रकल्पाविषयी कुठलीही माहिती आम्हांला देण्यात आलेली नाही. जेथे प्रकल्प होणार आहे, तेथे आमच्या जमिनी आहेत. जर पाने गावाचे १८७ हेक्टर क्षेत्र प्रकल्पात जात आहे, तर कडसरी लिंगाणा गावातील किती क्षेत्र प्रकल्पामुळे बाधित होते याची माहिती देण्यात आलेला नाही. आम्ही ग्रुप ग्रामपंचायतमध्ये मोडतो. तरी चर्चेसाठी आम्हांला बोलविणे आवश्यक असताना त्याची पूर्वकल्पना देण्यात आलेली नाही. तरी प्रकल्प प्रवर्तकांनी प्रकल्पाची संपूर्ण माहिती व

कडसरी लिंगाणा गावातील क्षेत्र गट नंबरसहित उपलब्ध करुन देण्यात यावी.

**अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी प्रकल्प प्रवर्तक यांना संबंधित व्यक्तीसोबत, तसेच कडसरी लिंगाणा गावातील इतर लोकांबरोबर चर्चा, वाटाघाटी झाल्यात का याबाबत विचारणा केली. श्री काशीराम कडू यांनी येथे आक्षेप नोंदविला आहे की कडसरी लिंगाणा ग्रामस्थांना माहिती देण्यात आलेली नाही.

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की प्रकल्प अगदी प्रारंभिक टप्प्यात (Initial Stage) आहे. जमीन घेताना सर्व संबंधितांशी चर्चा करुनच त्यांच्या संमतीनेच पुढील सर्व व्यवहार होतील.

**अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती** यांनी मत मांडले की भूसंपादनाची जी प्रक्रिया आहे, ती संबंधित जमिनीचा मालकीहक्क असलेल्या व्यक्ती,कुटुंब यांच्या पूर्वपरवानगीशिवाय पूर्ण होत नाही. संबंधित जमिन मालकाच्या परवानगीशिवाय शासनात कुठलेही व्यवहार होत नाहीत.

**६) श्री विजय पांडुरंग कडू, पाने कडसरी लिंगाणा पोलिस पाटीलः-**

| अनु. क्रं. | आक्षेप/सूचना/प्रश्न | चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| १) | ज्या ग्रामपंचायतीच्या हद्दीत हा प्रकल्प होणार आहे, ती ग्रुप ग्रामपंचायत आहे. आणि कडसरी लिंगाणा महसूली गाव हे वेगळे आहे. जर पाने गावातील १८७ कुटुंबे प्रभावित दाखवित आहेत, तर कडसरी लिंगाणाची काही कुटुंबे प्रभावित आहेत की नाही, कडसरी लिंगाणाचा समावेश प्रकल्पात आहे की नाही याची माहिती मिळावी. बैठकीत स्थानिकांनी उपस्थित केलेल्या सूचना/आक्षेपांनुसार कंपनीने पूर्व परवानगीशिवाय काम चालू केलेले आहे. मात्र प्रकल्पाचे व्यवस्थापन यांनी आमच्या कडसरी लिंगाणा गावातील जमिन मालकांशी संपर्क साधलेला नाही, प्रकल्पाची कुठलीही माहिती उपलब्ध केलेली नाही किंवा जमिनीच्या मोबदल्याबाबत कुठलाही | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले ज्या कुटुंबाची जमिन प्रकल्पात जाऊ शकते, त्या त्या कुटुंबांना प्रभावित वर्गात गणण्यात (calculated) आलेले आहे. तरी याबाबत जर अजून काही माहिती हवी असल्यास ती उपलब्ध करुन देण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | प्रस्ताव स्थानिकांना दिलेला नाही | |
| २) | आक्षेप नोंदवित आहे की ज्याठिकाणी प्रकल्प स्थापन करणार आहेत, तेथे कडसरी लिंगाणा गावातील भूधारक शेतकरी बाधित होणार आहेत. | प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की आपणास व सर्वांनाच प्रकल्पाबाबत, बाधित होणा-यांना अगोदर माहिती देण्यात येईल. आता कंपनी फक्त Geo-Technical Investigation टप्प्यातच आहोत. ते पूर्ण झाल्यानंतर ज्यांच्या जमिन प्रकल्प बाधित होणार आहेत, त्या सर्वांनाच माहिती देण्यात येईल. |

७) यावेळी **श्री प्रकाश सीताराम शेडगे, राहणार-पाने गाव, तालुका-महाड, जिल्हा-रायगड यांनी मत मांडले की** -

| **अनु. क्रं.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | प्रकल्पाच्या पर्यावरण अहवालात प्रस्तावित | **सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी** |

| | | |
|---|---|---|
| | प्रकल्पामुळे संभाव्य पर्यावरणाची हानी व त्यावरील शमन उपाय नमुद केलेले आहेत. पण प्रत्यक्ष काम सुरु झाल्यानंतर अनेक लहान-मोठे कंत्राटदार तेथे असतील. ते नियम पाळतील असे नाही. तर त्यावर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाची भूमिका व खबरदारी कशी असेल व आम्ही स्थानिकांनी त्याची खबरदारी कशी घ्यावी याबाबत विचारणा केली. | **सांगितले की** प्रकल्प प्रवर्तकांनी भारत सरकार नाबेट मान्यता प्राप्त पर्यावरण सल्लागाराची नियुक्ती केलेली असून पर्यावरण सल्लागार यांनी पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार प्रकल्प स्थानाच्या १० कि.मी. परिघात पर्यावरणीय सर्वेक्षण करुन प्रारुप (Draft) पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल सादर केलेला आहे. तसेच सादरीकरणात दर्शविल्यानुसार प्रकल्प प्रवर्तकांनी पर्यावरण व्यवस्थापन योजना (EMP – Environment Management Plan) तयार केलेली असून त्यासाठी ६७.० कोटी रुपये खर्च प्रस्तावित करण्यात आलेला आहे. ही जनसुनावणी परिसरातील जनतेस प्रस्तावित प्रकल्पाविषयी, त्यांना बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण सयंत्रणेची माहिती अवगत करण्यासाठी आहे. |

| | | |
|---|---|---|
| | | आपण उपस्थित केलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात येत असुन त्याचा बैठकीच्या इतिवृत्तात समावेश करण्यात येईल. सदरहू इतिवृत्त हे मराठी व इंग्रजीत तयार करण्यात येऊन ते मा. अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांच्या मान्यतेने मुख्यालय, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळातर्फे पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांना सादर करण्यात येते. तेथील तज्ज्ञ समिती याबाबत पुढील निर्णय घेते. पर्यावरण अनुमती (Environment Clearance) प्राप्त झाल्यानंतर त्याची प्रत ही संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात येत असते. आपण ती घेऊ शकता. त्यानुसार येथे काही त्रुटी आढळल्यास म.प्र.नि. मंडळाच्या स्थानीक कार्यालयास कळविल्यास त्यावर पुढील कार्यवाही करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | | शिवाय महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ वेळोवेळी पाहणी करण्यासाठी प्रकल्पास भेट देत असते व काही त्रुटी आढल्यास पुढील कार्यवाही करत असते. |
| २) | किल्ले रायगडच्या उत्तर भागात वारंगी येथे काळकुंभे हा शासनाचा मोठा प्रकल्प होत आहे. परंतु तो होण्याअगोदर त्याची जनसुनावणी झाली की नाही आणि याच प्रकल्पाची जनसुनावणी आयोजित करण्याचे कारण काय, याचा खुलासा व्हावा. | **सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी** स्पष्टीकरण दिले की पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, भारत सरकार, नवी दिल्ली यांनी पारित केलेल्या पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचना, २००६ नुसार काही विशिष्ट प्रकल्पांना भारत सरकार किंवा राज्य सरकार यांच्याकडुन प्रकल्प सुरु करण्यापूर्वी पर्यावरण अनुमती (Environment Clearance) प्राप्त करणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करणे आवश्यक आहे. त्यात जेएसडब्ल्यु प्रकल्प आहे. |
| ३) | आमच्या विभागात संपूर्ण ग्रामपंचायतींवर प्रशासक | अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी लेखी |

| | | |
|---|---|---|
| | नेमण्यात आलेला आहे. ते किती दिवस राहतील हे अनिर्णतीत आहे. तरी प्रकल्प प्रवर्तक यांना ना हरकत प्रमाणपत्र (No Objection Certificate) तेथील ग्रामसेवक, प्रशासक परस्पर देऊ शकतात का? अन्यथा, ग्रामसभा घेतल्याशिवाय त्यांनी परस्पर निर्णय घेऊ नये. | निवेदन सादर करण्याची सूचना केली. निवेदन मुख्य अधिकारी यांना त्यांचे कार्यालय सादर करतील अशी माहिती दिली. |
| ४) | पाने गावकरी प्रकल्पाचे स्वागतच करत आहेत. मात्र कुठल्याही परिस्थितीत पर्यावरणाची हानी होऊ नये याची दक्षता प्रकल्प प्रवर्तक यांनी घेतली पाहिजे.<br>तसेच प्रकल्प प्रवर्तक यांनी स्थानिकांसाठी कौशल्य प्रशिक्षण योजना राबवावी व त्यांना प्रकल्पात रोजगाराची संधि उपलब्ध करुन देण्यात यावी. | प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की प्रस्तावित प्रकल्पामुळे पर्यावरणाचा -हास हा होणारच नाही. तसेच स्थानिकांना रोजगारात प्राधान्य देण्यात येईल. जर स्थानीक युवक-युवतींना आय.टी.आय. प्रशिक्षणासाठी प्रायोजकत्व (Sponsorship) ची गॅरज असल्यास ते करण्यात येईल. |

| | | |
|---|---|---|
| | | येथे अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प प्रवर्तकांना प्रश्नाप्रमाणे उत्तर देण्याची सूचना केली. स्थानीक युवक-युवतींना प्रायोजकत्वाची गरज नाही. अध्यक्ष यांनी सांगितले की आता आपणास वेळ आहे. तर स्थानिक गावातील युवक-युवतींना प्रकल्पात रोजगारक्षम करण्यासाठी कौशल्य प्रशिक्षण योजना आपल्या पध्दतीने राबविण्यात यावीत. स्थानिक गावातील मुला-मुलींना कौशल्य प्रशिक्षण दिल्यानंतर कंपनी आस्थापनेत जी कुशल पदे असतील, त्यावर त्याची परिक्षा देऊन त्यांना प्रकल्पातील कुशल पदावर रोजगाराची संधि देण्यात यावी. परराज्यातील लोकांना आणण्यापेक्षा येथील स्थानिक युवक-युवतींना कुशल पदावर रोजगाराची संधि द्या. ही योजना राबविणे गरजेचे आहे, |

| | | |
|---|---|---|
| | | कारण प्रकल्प हा दुर्गम भागात आहे, येथे रोजगाराची संधि कमी प्रमाणात आहेत. |
| ५) | प्रकल्पाने स्थानिक १०, १२ वी उत्तीर्ण मुलां-मुलींसाठी अप्रेंटिसशिप योजना राबविल्यास त्यांना शिक्षण व उत्पन्नाचे साधन मिळेल. त्यामुळे स्थानिक प्रकल्पाचे स्वागत करतील व प्रकल्पासही प्रशिक्षण घेतलेले स्थानिक व्यक्ती उपलब्ध होतील. | सूचनेचे प्रकल्पातर्फे स्वागत करण्यात आले. |
| ६) | प्रकल्प पूर्ण कार्यान्वित झाल्यानंतर वीज निर्मिती सुरु झाल्यानंतर त्याचे टर्बाईन कायमस्वरुपी किती राहणार? त्या तापमानाचा प्रकल्पातील जैव-विविधतेवर काही परिणाम होणार आहे काय? स्पष्टीकरण द्यावे. | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की आपल्या प्रकल्पातील जे काही घटक (Components) आहेत, प्रेशर शाफ्ट, पॉवर हाऊस, transferable cable इ. सर्व जमिनीखाली राहणार आहेत. तरी या सर्व घटकांचा कुठलाही परिणाम पर्यावरणावर होणार नाही |
| ७) | रायगड किल्ला - उत्तरेला काळकुंभ मोठा प्रकल्प होत आहे - वारंगीला अदानीचा | अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उत्तर दिले की विधानसभा निवडणूक, |

| | | |
|---|---|---|
| | प्रकल्प होत आहे - पाने गावात जेएसड्बल्यु प्रकल्प - पूर्वेला लिंगाणा किल्ला - तर तो परिसर पर्यटन म्हणून घोषित करावयाचे असल्यास कसे प्रयत्न करावे लागतील? | २०२४ साठीचा आचारसंहिता लागलेली आहे. त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयात आल्यास त्यादृष्टीने मार्गदर्शन करण्यात येईल. |
| ८) | प्रकल्प बांधकामास केंव्हा सुरवात होईल व किती वर्षांनी संपूर्णपणे कार्यरत होईल? तसेच शासनाने जमिनी अधिग्रहित करण्यासाठी किती वर्षातचा कालावधी दिलेला आहे. | प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की शासनाकडून सर्व परवानग्या, पर्यावरण अनुमती प्राप्त करण्यासाठी एक-सव्वा वर्षे लागणार आहे. प्रकल्प बांधकाम टप्प्याला आला की तो ४२ (बेचाळीस) महिन्यात पूर्ण करणार आहोत.<br>येथे अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की शासनाच्या निर्देशांनुसार पाच वर्षात प्रकल्प उभारणे अपेक्षित आहे. तर येथे सर्व शासकीय परवानग्या मिळून जमिन खरेदी करावी लागणार आहे. तर त्यास पाच वर्षाचा कालावधी लागेल. |

| | | |
|---|---|---|
| ९) | माझा प्रश्न वेगळा आहे. परवानग्या मिळाल्यानंतर प्रकल्प अधिकारी जमीन खरेदी करणार. तर किती वर्षात जमिन अधिग्रहित करण्याची परवानगी आहे. म्हणजे त्यांनी त्या कालावधीत जमिन खरेदी केली नाही, तर प्रकल्प रद्द होणार व खरेदी केलेल्या जमिनीचे सात-बारे कोरे होणार, तो कालावधी किती याचे उत्तर देण्यात यावे. | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की Geo-Technical Investigation चालू आहे. ते पूर्ण झाले की प्रकल्पाचा डीपीआर तयार होईल. कंपनी लगेचच पुढील प्रक्रिया सुरु करेल. तत्पुर्वी आम्हांला वनविभागाची ना हरकत प्रमाणपत्र आवश्यक आहे. त्यानंतर म्हणजे अंदाजे फेब्रुवारी-मार्च, २०२५ ला जमिन खरेदीस सुरवात करण्यात येईल |
| | | |

८)**श्री निलेश परशुराम जगताप, मुक्काम पोस्ट- वाळण कुंड, तालुका-महाड,जिल्हा-रायगडः-**

त्यांनी त्यांच्या सूचना/आक्षेप वाचून दाखविले. सदरहू प्रकल्प हा आमच्या तालुक्यात होत आहे. या प्रकल्पामुळे स्थानिकांना रोजगार मिळेलच. मात्र प्रस्तावित प्रकल्पामुळे होणा-या संभाव्य दुष्परिणामावर शासनाचे दुर्लक्ष होत आहे असे आम्हांला वाटत आहे. पर्यावरण अहवालात नमुद केलेल्या दुष्परिणामाव्यतिरिक्त स्थानिक पातळीवर होणारे संभाव्य दुष्परिणाम म्हणजे पर्यावरणाचे नुकसान, काळ नदीतील उपसा करण्यात येणारी वाळू, स्थानिक लोकांना होऊ

शकणारा संभाव्य पाण्याचा तुटवडा याबाबत खुलासा केलेला नाही. प्रकल्प बांधकाम टप्प्यात व प्रकल्प सुरु झाल्यानंतर उद्‌भणा-या समस्या, याबाबत स्थानिक नागरिक, पर्यावरण अभ्यासक, यांच्यासमावेत विचार विनिमय करुन पुढील निर्णय घ्यावेत. विकासाला आमचा विरोध नाही, परंतु विकासाच्या नावाखाली महाड एमआयडीसीच्या माध्यमातून आमचे झालेले हाल आम्ही भोगत आलेले आहोत. स्थानिक जनता अधिकच खूप त्रस्त आहे. सबब आम्ही आपणास निवेदन देतो की आपण पुढील होणार संभाव्य दुष्परिणाम आपण व महाराष्ट्र शासनाने योजिलेल्या उपाययोजना याचा खुलासा सामान्य जनतेसमोर करावा.

तसेच आताच आमच्या ग्रामपंचायतींना प्रत्येक ठिकाणी प्रशासक लागलेला आहे. प्रशासक लागल्यामुळे ब-याच ग्रामपंचायतींना या प्रकल्पाची पूर्वसूचनादेखील नाही. हे निवेदन तात्पुरत्या स्वरुपाचे आहे. तरी प्रकल्प अहवालावर अभ्यास करुन निवेदन देण्यासाठी आम्हांला वेळ द्यावा ही नम्र विनंती.

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की उपस्थित केलेल्या योग्य सूचनांची अंमलबजावणी करण्यात येईल. तसेच सदरहू प्रकल्प सध्या Geo-Technical Investigation टप्प्यातच आहेत. त्यावर प्रकल्पाचे पुढील डिझाईन अवलंबून आहे. प्रकल्पास मान्यता मिळाल्यानंतर बांधकाम सुरु होण्यापूर्वी सर्व प्रकल्प क्षेत्रातील ग्रामपंचायतीस माहिती उपलब्ध करण्यात येईल.

९) **<u>श्री गणेश बारगे, राहणार-वारंगी, तालुका-महाड,जिल्हा-रायगडः-</u>**

जर वरच्या बाजूस  विद्युत प्रकल्प होणार आहे, तर खालच्या बाजूस जे पाणी सोडण्यात येणार आहे, त्याची गुणवत्ता कशी असेल, त्याबाबत माहिती देण्यात यावी.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की पाण्याच्या गुणवत्तेत काही बदल होणार नाही.  पाणी प्रदूषित होणार नाही.  त्याबाबत सर्वांनी निर्धास्त राहावे.

१०) **<u>श्री शांताराम कोलवजे, माजी पोलिस पाटील, पाने गाव, तालुका-महाड, जिल्हा-रायगडः-</u>**

आताच वीजपुरवठा व पाणीपुरवठा याबाबत सूचना उपस्थित करण्यात आली.  तर जेव्हा सर्वात प्रथम जेव्हा ही कंपनी चर्चेसाठी आली, त्याचवेळी याबाबत खुलासा करण्यात आलेला आहे.  प्रकल्प प्रवर्तकांनी कबूल केलेले आहे की गावाला वीजेची, पाण्याची व्यवस्था होईल.  तसेच पर्यावरणाची, आरोग्याची दखल घेण्याचे आश्वासन प्रकल्प प्रवर्तक यांनी दिलेले आहे.  तरी प्रकल्प प्रवर्तकांना काही माहिती द्यायची असल्यास ती देण्यात यावी.

प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की आम्ही सौर उर्जेची व्यवस्था करणार आहोत.  तसेच पाण्याची व्यवस्था करणार आहोत. पर्यावरणाचे काही नुकसान होत असेल, तर ग्रामस्थांना विश्वासात घेऊनच पुढील पर्यावरण योजना राबविण्यात येतील.

**श्री शांताराम कोलवजे** यांनी सांगितले की आता जो खांडसाचा प्रकल्प होत आहे, त्याचा वारंगीला काहीही त्रास होत नाही.

**११) श्री बाळू कनोजे - पाने गाव, तालुका-महाड,जिल्हा-रायगडः-**

येथील उपस्थित पाने गावच्या सरपंचांनी पाने गावाचा विचार करावा, शेजारी वाघेरी गावाबाबत कुठलेही मत मांडू नये. तसेच वारंगी गावात अदानी प्रकल्प येत आहे, त्याबाबत वारंगी गावाचे ग्रामस्थ यांनी विचार करावा.

१२) **श्री रामदास चव्हाण, राहणार-पाने गाव, तालुका-महाड, जिल्हा-रायगडः-**

| **अनु. क्रं.** | **आक्षेप/सूचना/प्रश्न** | **चर्चेला अनुसरुन प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार / पर्यावरणविषयक जनसुनावणी समिती यांनी दिलेली उत्तरे/आश्वासने** |
|---|---|---|
| १) | आता ऑनलाईनचा जमाना आहे. प्रस्तावित प्रकल्पामुळे ध्वनी प्रदूषणाचा त्रास प्रकल्प परिसरातील जनतेस होईल काय? | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की प्रस्तावित प्रकल्प हा जमिनीखाली असणार आहे. तरी प्रस्तावित प्रकल्पामुळे ध्वनि प्रदूषणाचा त्रास होणार नाही. |
| २) | सादरीकरणात दर्शविण्यात आलेले आहे की प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर | प्रकल्प प्रवर्तक यांनी सांगितले की जेव्हा प्रकल्प बांधकाम टप्प्यात असेल, |

| | | |
|---|---|---|
| | प्रकल्पात कंत्राटी कामगार घेणार आहेत. तर भूमीपुत्रांना कंत्राटी रोजगार का, त्यांना कायमस्वरुपी संवर्गात का सामाऊन घेणार नाहीत? | त्यावेळी कामगार हे कंत्राटी स्वरुपात राहतील. प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण होऊन प्रकल्प कार्यान्वित झाल्यानंतर संबंधित कामगारांना कायमस्वरुपी संवर्गात सामाऊन घेण्यात येईल. त्यांनी सांगितले की पॉवर हाऊसमध्ये टर्बाईन असणार आहे. तेथे व्हॉल्व प्रणाली असते. तेथे दुरुस्ती, देखभाल असते. त्यासाठी त्या कामात अनुभव असणारे कामगारांची गरज असते. त्यासाठी खाजगी तज्ज्ञ संस्थेकडूनच कामगारांची सेवा घेणे गरजेचे असते. त्यासाठी तेथे कंत्राटी हा उल्लेख करण्यात आलेला आहे. |

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना प्रस्वावित प्रकल्पाविषयी पर्यावरणविषयक प्रश्न, सूचना/आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले.

१३) **<u>श्री विठोबा पवार, राहणार - मु. पाने, ता. महाड, जि. रायगड.</u>**

पर्यावरणासंबधीच बोलायचे असल्याने त्याबाबतच बोलतो. वाहतुक सुरु झाल्यानंतर पाने गावचा जो रस्ता आहे, तो साधारणपणे कच्चा आहे. तो वाहतुकीमुळे जड वाहनांची वर्दळ वाढणार आहे, त्यामुळे तेथे मोठ्या प्रमाणात धूळ उडून तेथील जनतेस त्रास होणार आहे. तेथे मोठ्या प्रमाणात स्टील, बांधकाम साहित्य याची वाहतुक होणार आहेत. तरी त्या रस्त्याचे कॉक्रीटीकरण करण्याचा प्रस्ताव आहे का?

बैठकीत अगोदरच सांगितल्याप्रमाणे संबंधित रस्त्याचे नुतनीकरण करण्यात येणार आहे. प्रकल्पाची वाहतुक सुरु झाल्यानंतर परिसरातील ग्रामस्थांना कुठल्याही प्रकारचा त्रास होणार नाही.

१४) **<u>श्री बंडू सीताराम चांडवलकर, माजी सरपंच, पाने ग्रुप ग्रामपंचायत</u>**

मी या गावातील नागरिक आहे. ग्रुप ग्रामपंचायत पाने, कडसरी लिंगाणा येथील ग्रामस्थांचा हेतू हा आहे की येथील स्थानिक युवक-युवती आहेत, त्यांनादेखील येथे रोजगाराची संधि प्राप्त व्हावी. या पाने गावातील कुशल युवक हे मुंबई,पुणे, गुजरात येथे जाऊन रोजगार करत आहेत. प्रकल्पास आमचा विरोध नाही. मात्र येथील स्थानिकांचे प्रश्न सोडविण्यात यावेत ही विनंती.

प्रकल्प प्रवर्तक यांनी उत्तर दिले की आपली कंपनी ही स्थानिक युवक-युवतींनाच प्राधान्याने रोजगार देण्यासाठी प्रयत्नशील असेल. प्रकल्प परिसरातील विविध गावात आम्ही वैदकीय शिबिरे आयोजित करण्यास सुरवात करत आहोत.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांना त्यांच्या प्रस्तावित प्रकल्पाविषयी काही सूचना, आक्षेप असल्यास त्या उपस्थित करण्याचे आवाहन केले. उपस्थितांकडूना कोणताच प्रतिसाद नव्हता.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी उपस्थितांनी जनसुनावणीत उपस्थित केलेल्या प्रश्न, सूचना/आक्षेप यांना प्रकल्प प्रवर्तक यांनी योग्य प्रकारे उत्तरे दिलेली आहेत. खेळीमेळीच्या वातावरणात जनसुनावणी झालेली आहे.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सर्व उपस्थितांचे बैठकीस उपस्थित राहिल्याबद्दल आभार मानले आणि मा. अध्यक्षांच्या वतीने जनसुनावणी संपन्न झाल्याचे घोषित केले,

मा. अध्यक्ष यांचे आभार मानून जनसुनावणी ही संस्थगित करण्यात आली.

प्राप्त झालेल्या लेखी सूचना/आक्षेप सोबत जोडलेले आहेत.

**(ईश्वर ठाकरे)**
आयोजक,
पर्यावरणविषयक जाहिर
जनसुनावणी समिती
तथा
उप प्रादेशिक अधिकारी,
महाड
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण
मंडळ,
महाड

**(संजय भोसले)**
सदस्य,
पर्यावरणविषयक जाहिर
जनसुनावणी समिती
तथा
प्रादेशिक अधिकारी-रायगड
महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण
मंडळ,
नवी मुंबई

**(संदेश शिर्के)**
अध्यक्ष,
पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती
तथा
अपर जिल्हादंडाधिकारी, रायगड,
जिल्हा - रायगड